# "माझी कन्या भाग्यश्री जाणीव जागृती अभियान" या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी दिनांक १३.१२.२०१७ रोजी आयोजित पूर्व ई निविदा बैठकीचे इतिवृत्त

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत "माझी कन्या भाग्यश्री जाणीव जागृती अभियान" या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रकाशित करण्यात आलेल्या ई निविदेच्या अनुषंगाने पूर्व ई निविदा बैठक आयुक्तालयाच्या सभागृह कक्षात दिनांक १३.१२.२०१७ रोजी सकाळी ११.०० वा आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीसाठी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे अधिकारी व निविदाधारकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मा.आयुक्त हे अधिवेशनासाठी नागपूर या ठिकाणी गेलेले असल्याने ते या बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत. आयुक्तालयाच्यावतीने या बैठकीस श्री.गिरासे, सहाय्यक आयुक्त व श्री.तांबे, सहाय्यक आयुक्त हे उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीस उपस्थित सर्व प्रतिनिधींचे स्वागत करण्यात येऊन या ई निविदेसंदर्भात सविस्तर माहिती श्री.गिरासे यांनी दिली. सदरची बैठक ही ई निविदा संदर्भातील तांत्रिक बाबींचे स्पष्टीकरण होण्यासाठी आयोजित करण्यात येते. या ई निविदेसंदर्भात उपस्थित निविदाधारकांच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांची खालीलप्रमाणे मुद्देनिहाय माहिती देण्यात आली

१) सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी किमान ८ ते १० दिवस मैदान निविदाधारकाच्या ताब्यात देणे आवश्यक आहे. तसेच मंडपाचे आकारमानात बदल करणे आवश्यक आहे असे नमूद करण्यात आले. याबाबतीत कार्यक्रम आयोजनासाठी किमान ८ दिवस अगोदर मैदान संबंधित निविदाधारकास देणेबाबत शासनास विनंती करण्यात येईल व संबंधितांस उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच मंडपाची साईज मैदानाला शोभेल अशा पद्धतीची साधारणपणे १४०' x १४५०' एवढ्या क्षेत्रफळाची असेल. तसेच ई निविदेत नमूद २००० चौ.फुट मास्किंग हे Path Way साठी असून मंडपाच्या तीन्ही बाजूला मास्किंग लावणे आवश्यक आहे. मंडपाचा दर नमूद करताना या बाबींचा समावेश करण्यात येऊन या बाबींचा दर नमूद करण्यात यावा असे सांगण्यात आले.

२) ई निविदेच्या तपशिलात नमूदप्रमाणे बॅरिगेटींग हे मोजो बॅरिगेटींग प्रकारचे असावेत असे नमूद करण्यात आले. तसेच या कार्यक्रमासाठी ड्रोन कॅमेरा वापरता येणार नसल्याने त्याचे दर नमूद करण्यात येऊ नये असे स्पष्ट नमूद करण्यात आले.

३) या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विविध विभागांकडून परवानगी घेणेही आवश्यक असल्याने उदा. सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस, फायर, आर.टी.ओ, महानगरपालिका इ. आवश्यक परवानग्या या विभागामार्फत घेण्यात येतील असे स्पष्ट करण्यात आले.

४) या ई निविदेच्या तपशिलात मंडपांतर्गत ३० पेडस्टल फॅन आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले. त्याऐवजी १५० पेडस्टल फॅन आवश्यक असल्याने १५० नगाचा विचार करुन निविदाधारकाने दर नमूद करावा असे सांगण्यात आले. तसेच ई निविदेच्या तपशिलात नमूद २० मोबाईल टॉयलेट ऐवजी ५० मोबाईल टॉयलेट आवश्यक असल्याने त्याचा दर निविदाधारकांनी नमूद करावा.

५) या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्या २५००० विद्यार्थीनींची ने- आण करणेसाठी ५० सीटर बस किमान ५०० लागतील. परंतु ई निविदेच्या तपशिलात ३०० बस नमूद करण्यात आलेल्या आहेत. तसेच एवढ्या मोठ्या प्रमाणावर बसेसची उपलब्धता होणे कठीण असून पार्कींगची व्यवस्था करणे कठीण आहे असे सर्व निविदाधारकांनी सांगितले. तसेच या संदर्भात वाहनाची व्यवस्था व मुलांची जबाबदारी संबंधित शाळांवर सोपविल्यास कार्यक्रमाच्यादृष्टिने सोयीस्कर होईल असे देखील निविदाधारकांमार्फत नमूद करण्यात आले. यावर सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ३०० बसेस ऐवजी ४५० बसेस आवश्यक असल्याने निविदाधारकांनी दर नमूद करताना या बाबीचा विचार करुन दर नमूद करण्यात यावा. तसेच पार्कींगची व्यवस्था म्हाळुंगे - बालेवाडी या ठिकाणी करण्यात येईल असे विभागाच्या वतीने सांगण्यात आले. बसेसच्या उपलब्धतेबाबत विभागाच्यावतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचेशी चर्चा सुरु असून वाहनाची व्यवस्था संबंधित शाळांमार्फत किंवा आर.टी.ओ कार्यालयामार्फत होईल का याची चाचपणी सुरु आहे. तथापि निविदाधारकांना सदरची निविदा भरत असताना ४५० बसेसचा दर नमूद करणे अनिवार्य आहे असे स्पष्ट करण्यात आले.

६) कार्यक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थीनींना अल्पोपहार कसा देण्यात यावा याबाबत विचारणा करण्यात आली असता विद्यार्थीनींना सकाळी बसमध्ये बसल्यावर एक बिस्किट पुडा व २५० मि.ली. पाण्याची एक बाटली देण्यात यावी व कार्यक्रमस्थळी पोहोचल्यावर कार्यक्रमाच्या ठिकाणी दुपारचे अल्पोपहार बॉक्स व २५० मि.ली. पाण्याची बाटली देण्यात यावी असे स्पष्ट करण्यात आले.

७) बॅक ड्रॉप व उभारण्यात येणाऱ्या कमानी तसेच योजनेच्या माहितीचे कट आऊटस् यांचा मसूदा दि.२६.१२.२०१७ पर्यंत यशस्वी निविदाधारकास पुरविण्यात येईल तसेच दृकश्राव्य चित्रफितीचा मसुदा व चित्रीकरणाचे ठिकाण देखील त्याच दिवशी कळविण्यात येईल. तसेच स्पर्धकांसाठी देण्यात येणारी प्रमाणपत्रे निविदाधारकास ८ दिवस अगोदर पुरविण्यात येतील.

८) प्रत्येक निविदाधारकास किमान रु.३५.०० लाख इतक्या रक्कमेचे पत असलेले Credit Worthiness Certificate सादर करणे अनिवार्य आहे, याची सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी असे नमूद करण्यात आले.

९) या कार्यक्रमाचे आयोजनासाठी ई निविदेत Attendant हे पार्कींग स्टेज व मंडपासाठी ५० असे नमूद करण्यात आले आहेत. तथापि या कार्यक्रमासाठी किमान १०० Attendant ची आवश्यकता असल्याचे निविदाधारकांशी चर्चा करण्यात आली. त्यानुसार किमान १०० Attendant ची आवश्यकता गृहित धरुन दर निविदाधारकांनी नमूद करावा असे स्पष्ट करण्यात आले.

१०) सदरच्या प्रकाशित ई निविदेचे अंदाजपत्रकीय दर्शनीय मूल्य रु.१.२५ कोटी ऐवजी रु. १.५० कोटी असल्याची माहिती सर्व निविदाधारकांना देण्यात आली.

उपस्थित सर्व सहभागी निविदाधारकांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

Commissioner Integrated Child Development Scheme, Raigad Bhavan Navi Mumbai

सहाय्यक आयुक्त
तथा नोडल अधिकारी (ई निविदा)
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

D:\भाग्यश्री मेळावा ई निविदा.docx